# वसई-विरार शहर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग, मुख्यालय

---

## प्रेसनोट

दि.१६/०६/२०२५

वसई-विरार शहर महानगरपालिकेस सुर्या टप्पा-१ व ३ या योजनेतुन २०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणीपुरवठा योजनेतून १५० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत आहे.

MMRDA च्या पाणी पुरवठा योजनेतील कवडास पंपिंग स्टेशन आणि सूर्या नगर जलशुद्धीकरण केंद्र (कासा विक्रमगड) येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी MSEDCL मार्फत विज पुरवठा होत आहे. सदर भागात दि.१३/०६/२०२५ पासून वादळी वाऱ्यासह पाऊस होत असल्याने सदर ठिकाणी विद्युत तारांवर झाडांच्या फांद्या पडून योजनेचा विजपुरवठा वारंवार खंडीत होत आहे.

सुर्या योजनेतील मासवण व धुकटण येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या ठिकाणी देखील वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू असल्याने महराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत होणार विजपुरवठा दि.१३/०६/२०२५ रोजी पासून वारंवार खंडीत होत आहे.

सद्यस्थितीत दि.१६/०६/२०२५ रोजी सकाळी ८.०० वा. पासून MMRDA च्या योजनेतून होणारा पाणी पुरवठा विस्कळीत झाला असून वसई-विरार शहरास होणारा पाणी पुरवठा कमी प्रमाणात व कमी दाबाने होत आहे.

तरी पुढील ३ ते ४ दिवस महापालिका क्षेत्रास होणारा पाणी पुरवठा हा अपुऱ्या व कमी दाबाने होणार असून नागरीकांनी उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.


(दिपक झिंजाड)
उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका